| योजनेचे नाव | सारथी शेतकरी मावळा कृषि कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण कार्यक्रम |
|---|---|
| **योजनेची सुरुवात** | सन २०२४-२५ |
| **लाभार्थी लक्षांक** | ५०० |
| **योजनेचा उद्देश** | शास्त्रोक्त पद्धतीने मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देऊन कृषि व कृषि पूरक स्वंय-रोजगार व रोजगार संधी निर्माण करणे |
| **योजनेचे स्वरूप** | लक्षित गटातील सदस्यांसाठी मधुमक्षिका पालन प्रशिक्षण आयोजित करणे. |
| **प्रशिक्षण ठिकाण** | पात्र लक्षित गटातील सदस्याना खालील संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्यात येईल.<br><br>१. केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (CBRTI) शिवाजीनगर ,पुणे येथे ०५ दिवस व ३० दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येईल.<br><br>२. मध संचालनालय महाबळेश्वर , जि . सातारा या ठिकाणी ०५ दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. |
| **प्रशिक्षण कालावधी /टप्पे** | केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (CBRTI) शिवाजीनगर ,पुणे येथे ०५ दिवस व ३० दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येईल.<br><br>२. मध संचालनालय महाबळेश्वर , जि . सातारा या ठिकाणी ०५ दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. |
| **लाभार्थी पात्रता** | या योजनेचा लाभ घेण्यासाठी लक्षित गटातील सदस्याना sarthi-maharashtragov.in या website वर जाऊन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदार हा खालील पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे.<br><br>• अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा – कुणबी आणि कुणबी – मराठा असावा.<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. |

| | |
|---|---|
| | • सदर प्रशिक्षणाकरिता अर्जदार हा किमान दहावी पास असावा व एक महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रम करिता पदवीधर अथवा B.Sc Agri असल्यास प्राधान्य देण्यात येईल.<br>• अर्जदाराचे वय किमान १८ व जास्तीत जास्त ४५ वर्ष असावे.<br>• सारथी, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत या प्रकारच्या या बाबीचा लाभ याअगोदर घेतलेला नसावा.<br>• ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर सारथीचे विभागीय कार्यालय मार्फत आपण केलेल्या अर्ज आणि कागद पात्रांची ऑनलाइन तपासणी केली जाते. योजनेच्या अटी शर्ती प्रमाणे सर्व कागद पत्र जोडलेली असल्यास ऑनलाइन शिफारस करतील. अर्जात त्रुटी असल्यास पुनःश्या आपल्याकडे पाठविण्यात येईल.<br>• ऑनलाइन प्राप्त झालेल्या त्रुटींची पूर्तता ऑनलाइन करावी लागेल. तसेच योजनेच्या अटी शर्तीची पूर्तता होत नसल्यास अपात्र ठरविण्यात येईल. |
| **आवश्यक कागदपत्रे** | ऑनलाइन अर्ज करताना अर्जदाराने खालील कागदपत्रांची PDF करून आपलोड करणे आवश्यक आहे. आपलोड केलेली सर्व कागदपत्र सुस्पस्ट व वाचनीय असावे<br>• जातीचा दाखला / (मराठा करिता-कुणबी व कुणबी-मराठा,कुणबी)<br>• शाळा सोडल्याचा दाखला अथवा जातीचा दाखला (मराठा करिता)<br>• नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र /EWS प्रमाणपत्र तहसिलदार यांचा मागील /३ वर्षांचे वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाख रुपयांपेक्षा जास्त नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Income Certificate)<br>• आधार कार्ड, जन्म दाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र<br>• बँक अकाउंट तपशील<br>• रहिवासी दाखला(डोमिसाईल) |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया** | • लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्या करिता जाहिरात सारथीचे संकेत स्थळावर व राज्यातील वर्तमानपत्रा मध्ये प्रसिद्ध केली जाईल.<br>• प्रथम येणाऱ्या पात्र अर्जदारांची निवड प्राधान्यांने करण्यात येईल.<br>• प्रशिक्षण वर्गाच्या क्षमतेनुसार लाभार्थींना प्रशिक्षणाची तारीख व निवडीबाबत कळविण्यात येईल .<br>• कुटुंबातील जास्तीत जास्त एकच सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाईल.<br>• सदर प्रशिक्षण ही मोफत राहील. |

| | |
|---|---|
| **लाभाचे स्वरूप :** | केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (CBRTI ) या संस्थेबरोबर केलेल्या सामंजस्य करार नुसार ०५ दिवशीय निवासी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण शुल्क म्हणून प्रती प्रशिक्षणार्थी रु. ८०००/- प्रशिक्षण संस्थेस अदा केले जाईल या प्रशिक्षण प्रशिक्षण शुल्क मध्ये एक वेळेच्या नाष्टा, दोन वेळेचा चहा आणि दोन वेळेचे जेवण व क्षेत्र भेटीचा समावेश असेल. तसेच तीस दिवसीय निवासी मधुमक्षिका पालन प्रमाणपत्र कोर्स साठी प्रशिक्षण शुल्क म्हणून रु. ३००००/- प्रती विद्यार्थी ३० दिवसासाठी देय राहील. प्रशिक्षण यशस्वी रित्या पूर्ण झाल्यानंतर आणि प्रशिक्षण संस्थेकडून देयक प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षण संस्थेस अदा केले जाईल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण शुल्क भरण्याची आवश्यकता नसून त्यांना हे प्रशिक्षण मोफत आहे. |
| **प्रशिक्षण संस्थेबाबत** | केंद्रीय मधमाशी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (CBRTI) शिवाजीनगर ,पुणे येथे ०५ दिवस व ३० दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येईल.<br><br>२. मध संचालनालय महाबळेश्वर , जि . सातारा या ठिकाणी ०५ दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. |
| **अपात्रतेचे निकष** | • कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे.<br>• ऑनलाइन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची माहिती भरणे.<br>• सारथी अंतर्गत या उपक्रमातून या पूर्वी या प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला असल्यास<br>• वयोगटात बसत नसल्यास<br>• नियमांचे उल्लंघन केल्यास |